# रणभूमीचे सत्यकथन !


जनरल अॅक्ट 1848 साली 'कारी' या रणभूमीचे सैनिकी विश्लेषण करण्याकरता पोचला. त्याचा इतिहास दांडगा होता. पुरु–अलेक्झांडर युध्दाचे ठिकाण स्वतः डोळ्यांखालून घालून अॅबटने दीडशे वर्षापूर्वी कारी रणभूमीचे नकाशे काढले. मूळ ग्रीक नकाशांशी ते ताडून पाहिले. त्याच्या अभ्यासातून भारत आणि पाकिस्तानच्या पुरातत्व आणि सांस्कृतिक मंत्रालयांना खूप काही मिळेल.

राजा पुरुने आपल्या युध्दकौशल्याचा एक आलेख कारी या रणभूमीच्या रुपाने गेली 2,334 वर्षे मागे ठेवला आहे. पुरुने अलेक्झांडरचा धुव्वा उडवल्याचा भौगोलिक पुरावा म्हणून कारी रणमैदान महत्वाचे तर आहेच, परंतु भारत–पाक सांस्कृतिक संबंद दृढ पायावर नव्याने उभारणारा एक स्मृतिविशेष आहे. अॅबटनं लिहून ठेवलंय.....

कर्टीस या ग्रीक इतिहासकाराने लिहिलंय –

ग्रीक नोंदीना खोटे ठरवल्याचा हा एक स्पष्ट पुरावा मागे राहिला आहे.

अलेक्झांडरचे सैन्य स्वतःची जागा सोडून का हलले, त्यांना काय अडचणी आल्या. त्याचे हे वर्णन आहे. त्या सैन्याला सोसायटयाचे वारे 'क्वार्टझ्' म्हणजे 'वज्र' नावाच्या मौल्यवान खडकाचे सुळके, शिळा यात पुरुच्या सेनेला नव्हे तर अलेक्झांडरच्या सैन्यालाच चिखल, दलदल, काटेरी झुडपे यांच्या अडथळयातून मार्ग काढावा लागला. तोही सर्व रसद तुटल्याने उपाशी पोटी असताना सैनिक व घोडी यांना दाणा, वैरण मिळण्याचे वांधे झाले. झेलमच्या उताराशी पाऊस नसताना (फेब्रूवारी, मार्चमध्ये) जी नदी ग्रीक सैन्य सहजी ओलांडू शकले असते त्यांना त्या उंच पात्रातील भोवरे म्हणजे मृत्यूला आमंत्रण वाटले.




पुरुच्या वाटयाला असले दिव्य आले नाही. कारण त्याची रणभूमी क्वार्टझ् दगडाची बनली होती. ती दोन्ही बाजूंनी 'कारी' या टेकडीने आपल्या बाहूत कवटाळून घेतली होती.

ॲबटने ग्रीक नकाशाचे सर्वेक्षण करताना हे पठार झेलमला भिडलेले असल्याचे नमूद केले. त्या टेकडीवरील सर्व मोक्याच्या ठिकाणी चौया उभारुन पुरुने एकही ग्रीक सैनिक जिवंत परत शकणार नाही अशी व्यवस्था केली. 1848 सालच्या परीक्षणाला पाच मैलांच्या पठारावर पुरुच्या प्रदेशात मंगला सिराई (सिरवई), सुखचैनपूरा, नौरंगापुरा व

काही ही गावे ॲबटला आढळली. तर अंभीच्या प्रदेशात भूमा, हरणपूर याठिकाणी अलेक्झांडरच्या सैन्याने नदी ओलांडली.

अंभीच्या प्रदेशाचे स्वरुप मातीचे मैदान, तर पुरुचे दगडी पठार, हा स्पष्ट फरक ॲबटने नमूद केला आहे. अलेक्झांडर व त्याचे अधिकारी जूनमध्ये रणभूमीवर पोचले. अंभीच्या प्रदेशात मातीच्या मैदानामुळे दलदल, धुवॉधार पाऊस, वारे यांच्या सोसायटयात अलेक्झांडरची मुख्य छावणी, चौक्या भुईसपाट झाल्या. धान्य पुरवठा निसर्गकोपात ठराविक वेळात पोचू न शकल्याने अलेक्झांडरपुढे दोनच पर्याय उरले–एक तर पुरुशी संधी किंवा लढून पराभूत होणे.

अलेक्झांडरचे स्कॉटलड यार्डने केलेले मानसिक विश्लेषण असे सांगते की ज्या वेळची त्याची अवस्था बळी जाणाÚया बकÚयासारखी झाली. त्याचे सैन्यावर हवे तेवढे नियंत्रण राहिले नाही. परिणामी हाती असलेले जेमतेम अकरा हजार सैन्य त्याने जिवाच्या कराराने युध्दात ओतले. त्याआधी सतरा मैल ते चालत. पोहत स्वतःची जनावरे शस्त्रसंभार सांभाळत पोचेपर्यंत सुमारे सोळा ते सतरा तास वाया गेले. 'सिरवई' हे पुरु प्रदेशातील ठिकाण, तिथे ते जर महत्प्रयासाने उतरलेच असतील तर ती जागा रणभूमीच्या जवळजवळ मध्यावर म्हणजे ग्रीक म्हणतात त्या भारतीय सैन्याच्या  दोन्ही बगला गाठणे म्हणजे परत दोन्ही बाजूकडे दोन ते अडीच मैल लढत जाणे ही शारीरिक व मानसिक दुबळया सैन्याला कठीण गोष्ट होती. ग्रीकांच्या वर्णनाशी जनरल ॲबटचे व एकूणच शरीरतज्ञांचे मत जुळत नाही. त्यात जो बावीस ते सव्वीस तासांचा वेळ जातो त्यात कुठल्याही देशाचा सैनिक इतका थकून जाईल की तो शत्रूला शरण तरी जाईल किंवा पळून जाईल.

स्कॉटलंड यार्डचे 2000 सालचे कमांडर जॉन ग्रीव्हचे निष्कर्ष विज्ञानावर आधारित आहेत. ॲबटचे निष्कर्ष हे त्याच्या भौगालिक व सैनिकी ज्ञानावर आधारित आहेत. याचे इमेजरी संशोधन करण्याची संधी जर इस्त्रोच्या उपग्रहाला मिळाली तर झेलम ते मकरान या सिंधू नदी व वाळवंटाच्या प्रदेशातील पूर्ण संकलन केल्यास भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांना स्वतःच्या इतिहासाचे पुनर्लेखन करण्यासाठी उपयोगी ठरेल.

– – –